Read India Books

# वायु

माधुरी पै





Original Story (*Marathi*) Vara by Madhuri Pai
© Pratham Books, 2004

Second edition: 2005

Illustrations: Rijuta Ghate
English Translation: Rohini Nilekani

ISBN: 81-8263-034-7

Registered Office:
PRATHAM BOOKS
930, 4th Cross, 1st Main,
MICO Layout, Stage 2, Bangalore 560 076

Regional Offices in Mumbai and New Delhi

Typesetting and Layout by: Trimiti Services

Printed by: Jolly Offset

Published by:
Pratham Books

www.prathambooks.org

...elopment of this book was sponsored by Dubai Creek Round Table, Dubai, U.A.E.

# वारा

लेखिका

**माधुरी पै**

चित्रांकन

**ऋजुता घाटे**

आंघोळ करताना मजा येते.
ओल्या अंगाला गार गार वाटते.
कोणामुळे बरे ?
तो वारा.



7710

गरम दूध कपात ठेवले.

दूध लवकर गार झाले.

कोणामुळे बरे ?


तो वारा.



खिडकीचे पडदे उडू लागले.
समोर येऊन अंगाला चिकटले.
कोणामुळे बरे ?
तो वारा.



लखदिशी वीज चमकली.
काळ्या ढगांची गर्दी वाहू लागली.
कोणामुळे बरे ?
तो वारा.



फांद्या हलल्या, पाने हलली.
बघता बघता फुले पडली.
कोणामुळे बरे ?
तो वारा.



अंगणात खेळ रंगात आला
आणि लाडूचा गोड वास आला.
कोणामुळे बरे ?
तो वारा.



7710

खिडकीवरचा काचेचा पेला,
खाली पडून खळदिशी फुटला.
कोणामुळे बरे ?
तो वारा.




कुक कुक शिटी झाली.
दूर स्टेशनवर गाडी आली.
गाडी दिसली नाही पण शिटी ऐकू आली.
कोणामुळे बरे ?
तो वारा.



दिसत नाही, बोलतही नाही.

पण खूप कामे करतो.

तो वारा.





**वारा** मुलांच्या वाचनासाठी सराव म्हणून उपयोगी आहे. निसर्गातील न दिसणाऱ्या पण पावलोपावली जाणवणाऱ्या वाऱ्याची ओळख यात करून दिली गेली आहे.

## मुलांसाठी आमची अन्य प्रकाशने

आम्ही सारे प्राणी

एक होते झाड

तरंगत तरंगत

ISBN 81-8263-034-7
9788182630345

**PRATHAM BOOKS**
Vara (Marathi)
Rs. 15.00